जा.क्र.690/सहा.स.अभि./स.न्या.पैरवी./बैठक/२०१९
कार्यालय अप्पर पोलीस अधीक्षक हिंगोली
दिनांक. १९.०६.२०१९

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक श्री यशवंत काळे यांचे अध्यक्षतेखाली नागनाथ सभागृह, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली येथे दिनांक १५.०६.२०१९ रोजी १६.०० वा. १)महाराष्ट्र शासन गृह विभाग डिजीपी/प्र.क्र.५१/पोल—१० मंत्रालय मुंबई दि.१७.१०.२०१५ २)महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.केमाअ—१११५/प्र.क्र. ५०/पोल—१० मुंबई दि.२५.११.२०१६ चे निर्देशानुसार जिल्हा सहायक सरकारी अभियोक्ता सत्र न्यायालय, प्रथमवर्ग न्यायालय हिंगोली जिल्हा व पैरवी अधिकारी यांचे संयुक्त बैठकीचा इतिवृत्तांत

---

दि. १५.०६.२०१९ रोजी १६.०० वा. श्री. योगेश कुमार ,मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शना खाली नागनाथ सभागृह, पोलीस अधीक्षक कार्यालय, हिंगोली येथे अपर पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे अध्यक्षतेखाली सहायक सरकारी अभियोक्ता हिंगोली, कळमनुरी, सेनगांव, औंढा ना. न्यायालय येथील, सर्व पो.स्टे. पैरवी अधिकारी,उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगोली श. व हिंगोली ग्रामिण यांची संयुक्त बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील जिल्हा सहायक सरकारी अभियोक्ता कोर्ट पैरवी पोलीस अधिकारी व कर्मचारी बैठकीस हजर होते

१) श्री एन.एस.मुटकुळे,सरकारी अभियोक्ता अति.जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली
२) श्री जी.व्ही.घुगे सरकारी अभियोक्ता अति. जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली
३) श्री एम.एस.पठाडे अति.जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली.
४) श्री एस.डी.कुटे, सहायक सरकारी अभियोक्ता, अति. जिल्हा सत्र न्यायालय,वसमत.
५) श्री एस.के. दासरे, सहायक सरकारी अभियोक्ता, अति. जिल्हा सत्र न्यायालय,वसमत
६) श्री जि. के. जगताप सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली.
७) श्री एन.एम. पाईकराव, सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली.
८) श्रीमती एस.व्हि. माहुरे, सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,कळमनुरी.
९) श्रीमती ए.ए. कदम, सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली.
१०) श्रीमती एम.एस. सुपारे, सहायक सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली.
११) श्री एस.जि.जोंधळे, पोउपनि जिल्हा व सत्र न्यायालय,हिंगोली.
१२) सपोउपनि/जि.एस. कऱ्हाळे, पो.स्टे. कळमनुरी (हिंगोली सेशन)
१३) सपोउपनि/एस.डी. विरकर, प्रथमवर्ग न्यायालय,औंढा ना.पो.स्टे. औंढा ना.
१४) सपोउपनि/एस.एल. डुकरे, प्रथमवर्ग न्यायालय,सेनगांव, पो.स्टे. सेनगांव

१५) सपोउपनि/बि.व्हि. शिंदे, जिल्हा व प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली,पो.स्टे. बासंबा
१६) पोह/३२९ बोराडे,मा. अपर सत्र न्यायालय, औंढा ना. पो.स्टे. औंढा ना.
१७) पोह/५१७ गव्हाणे, प्रथम वर्ग न्यायालय,कळमनुरी, पो.स्टे. बाळापुर
१८) पोह/०१ आर.एस. वंजे, अपर सत्र न्यायालय,वसमत, पो.स्टे. वसमत श.
१९) पोह/५३२ व्हि.एस. बोदेमवाड, जिल्हा व प्रथमवर्ग न्यायालय,वसमत पो.स्टे. हट्टा.
२०) पोना/६८५ जोगदंड, जिल्हा व प्रथमवर्ग न्यायालय, वसमत, पो.स्टे. वसमत ग्रा.
२१) पोशि/९७९ व्हि.के. कुटे, प्रथमवर्ग न्यायालय, सेनगांव, पो.स्टे. गोरेगांव.
२२) पोशि/२९७ राठोड, प्रथमवर्ग न्यायालय, पो.स्टे.बासंबा
२३) पोशि/२०९ जगताप, प्रथमवर्ग न्यायालय, पो.स्टे. कळमनुरी.
२४) पोशि/९५८ एम.व्हि. पतंगे, प्रथमवर्ग न्यायालय, पो.स्टे. वसमत श.
२५) पोशि/९७५ पि.ए. मार्कंड, जिल्हा व प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली,पो.स्टे. गोरेगांव.

बैठकीत मा. पोलीस अधीक्षक हिंगोली यांनी मा. पोलीस महासंचालक,म.रा.मुबई यांचे पत्रक क्र.पोमसं/२१/मा.अ./आशुतोष शुक्ला/२२८/२०१६अन्वये महाराष्ट्र शासन गृह विभाग परिपत्रक १)महाराष्ट्र शासन गृह विभाग डिजीपी/प्र.क्र.५१/पोल–१० मंत्रालय मुंबई दि.१७.१०.२०१५व २)महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.केमाअ–१११५/प्र.क्र.५०/पोल–१० मुंबई दि.२५.११.२०१६चे निर्देशानुसार तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने ज्या गुन्हयामध्ये आरोपीची निर्दोष मुक्तता झाली आहे. त्या बाबतच्या न्यायालयाच्या आदेशाची तपासणी करून सदर खटल्याचा निकाल शासनाच्या विरूध्द जाण्या मागे कारणे काय आहे? याची तपासणी करणे व सदर न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्याच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरूध्द गेला असल्यास संबंधीतावर जबाबदारी निश्चित करण्यासाठी हिंगोली जिल्हास्तरावरील समितीची संरचना करण्यात आलेली आहे..

सदर समितीचे बैठकीत सत्र न्यायालय, हिंगोली येथून निर्दोष सुटलेल्या खालील सत्र खटल्यां बाबत कारण मिमांसा करण्यात आली.

१.पो.स्टे. गोरेगांव गुरनं. ४१/२०१४ कलम कलम ३५४(अ),३२३,५०६ भादंवि सह ३(१)(११) अजाजअप्रका,अपर सत्र न्यायालय, हिंगोली **सत्र खटला क्र. २३/२०१६ सरकार विरूध्द श्रीराम** या खटल्यातील आरोपीची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

<u>कारण मिमांसा :–</u>

१. सरकार पक्षाने मा. न्यायालयामध्ये एकाच साक्षीदाराची, फिर्यादीची साक्ष नोंदविली. फिर्यादी मा. न्यायालयामध्ये फितूर झाली.
२. सरकार पक्षाने तपासीक अंमलदार तसेच डॉक्टरांची साक्ष मा. न्यायालयामध्ये नोंदविली नाही
३. तपासीक अंमलदार/एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.
४. अपीलास अयोग्य.

२. पो.स्टे. सेनगांव गुरनं ५८/२०११ कलम १४७,१४८,३०७,३२४,३२३,५०४,१४९,भादंवि अपर सत्र न्यायालय हिंगोली **सत्र खटला क. ०५/२०१२ सरकार विरूध्द भास्करराव व ईतर** या खटल्यातील सर्व आरोपींची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे

<u>कारण मिमांसा :—</u>

१. जखमी प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने फिर्यादीचे साक्षचे समर्थन केले नाही.

२. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फितूर झाले.

३. जप्ती पंचनामा पंच फितूर झाले.

४. वैद्यकिय पुरावा सरकार पक्षाचे समर्थन करणारा ठरला नाही.

५. फिर्यादीची साक्ष मा. न्यायालयात संशयास्पद ठरली.

६. घटनास्थळावर आरोपींची उपस्थिती संशयास्पद ठरली.

७. फिर्यादीने मा. न्यायालयापासून सत्य लपविले असे मा. न्यायालयाचे निरीक्षण.

८. तपासीक अंमलदार /एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.

९. अपीलास अयोग्य.

३. पो.स्टे. बासंबा गुरनं २५/२०१५ कलम ३१३,३२४,५०४ भादंवि अपर सत्र न्यायालय हिंगोली **सत्र खटला क. ३७/२०१६ सरकार विरूध्द दिलीप** या खटल्यातील आरोपीची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

<u>कारण मिमांसा :—</u>

१. फिर्यादी मा. न्यायालयामध्ये फितुर झाली.

२. सरकारी पक्षाने घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार,डॉक्टर व तपासीक अंमलदार यांना मा. न्यायालयामध्ये तपासले नाही.

३. तपासीक अंमलदार /एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.

४. अपीलास अयोग्य.

४. पो.स्टे. आ.बाळापुर १७१/२०१७ कलम ३५४(१)(ए)(डी)(ए),२९४,३२३,५०४,भादंवि अपर सत्र न्यायालय हिंगोली **सत्र खटला क. ०९/२०१७ सरकार विरूध्द संतोष** या खटल्यातील आरोपीची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

<u>कारण मिमांसा :—</u>

१. गुन्हयामध्ये तपासीक अधिकारी यांनी तपासलेले सर्वच साक्षीदार एकाच कुटुंबातील होते. गर्दीचे ठिकाण (घटनास्थळ) असूनही एकही तटस्थ प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासण्यात आला नाही.

२. पिडीता व तिची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार मैत्रिण मुक्ता यांचे साक्षमध्ये अनेक आली.

३. सर्वच साक्षीदारांची साक्ष घटनेसंदर्भात एकमेकांशी विसंगत असल्यामुळे विश्वासदर्शक न ठरता संशयास्पद ठरली.

४. गुन्हयाचा तपास तपास तपासीक अधिकारी यांनी केवळ एकाच दिवसात संपवुन चार्जशिट दाखल केल्याबाबत तसेच तपासामध्ये पक्षपात व घाई गडबड असल्याची नोट (नोंद) मा. न्यायालयाने घेतली.
५. तपासीक अंमलदार /एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.
६. अपीलास अयोग्य.

५. पो.स्टे. बासंबा गुरनं. ३३/२०१८ कलम ३७६ भादंवि सह ४ पोक्सो अपर सत्र न्यायालय हिंगोली **सत्र खटला क्र. ०८/२०१८ सरकार विरूध्द सिध्दार्थ** या खटल्यातील आरोपीची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

<u>कारण मिमांसा :—</u>

१. पिडीता तसेच तिची साक्षीदार आई मा. न्यायालयात फितुर झाले. त्यांनी आरोपी विरूध्द काहीही सांगितले नाही.
२. तपासीक अंमलदार/एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.
३. अपीलास अयोग्य.

६. पो.स्टे. हिंगोली श. गुरनं. ७२/२०१५ कलम ३०७,३२३,५०४,५०६,३४ भादवि. सह ५(१)(क),२७(१) भा.ह.का. अपर सत्र न्यायालय हिंगोली **सत्र खटला क्र. ०२/२०१७ सरकार वि. लक्ष्मण व ईतर** या खटल्यातील सर्व आरोपींची मा.न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली.

<u>कारण मिमांसा :—</u>

१. फिर्यादी/जखमी,प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तसेच जप्ती पंचनामा पंच मा. न्यायालया समक्ष फितुर झाले.
२. तपासीक अंमलदार/एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.
३. अपीलास अयोग्य.

७. पो.स्टे. कळमनुरी गुरनं. ४२/२०१४ कलम ३०७,३२३,५०४,१४७,१४८,१४९ भादवि. अपर सत्र न्यायालय,हिंगोली **सत्र खटला क्र. ४७/२०१७ सरकार विरूध्द उत्तम व ईतर** या खटल्यातील सर्व आरोपींची मा.न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

<u>कारण मिमांसा :—</u>

१. फिर्यादी तसेच जप्ती पंचनामा पंच मा. न्यायालयात फितुर झाले.
२. सरकार पक्षाने घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादीची आई,वडील व बहिण यांना साक्षीदार म्हणुन मा. न्यायालयात तपासले नाही.
३. सरकार पक्षाने तपासीक अधिकारी यांची साक्ष नोंदविली नाही.
४. तपासीक अंमलदार /एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.
५. अपीलास अयोग्य.

८. पो.स्टे. गोरेगांव गुरनं. ७७/२०११ कलम ३७६,३६६,३६३,३२३,५०४,५०६,३४ भादंवि अपर सत्र न्यायालय, हिंगोली **सत्र खटला क्र. ५३/२०१२ सरकार विरूध्द दिपक व ईतर** या खटल्यातील सर्व आरोपींची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

कारण मिमांसा :—

१. सरकार पक्षाने नमुद गुन्हयामध्ये केवळ एकच साक्षीदार मा. न्यायालया मध्ये तपासला तो फितुर झाला.

२. अनेक वेळा समन्स काढून तसेच वारंट काढुनही सरकार पक्ष पिडीतेला साक्षकामी मा. न्यायलायात हजर होवू शकला नाही. परिणामी आरोपी विरूध्दचा चार्ज सिध्द होवू शकला नाही

३. तपासीक अंमलदार /एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.

४. अपीलास अयोग्य.

९. पो.स्टे. हिंगोली ग्रा. गुरनं. ७३/२०१४ कलम ३०७,३२४,३२३,५०४,५०६,३४ भादंवि. अपर सत्र न्यायालय हिंगोली **सत्र खटला क्र. ०४/२०१८ सरकार विरूध्द लक्ष्मण व ईतर** या खटल्यातील सर्व आरोपींची मा. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केलेली आहे.

कारण मिमांसा :—

१. फिर्यादी व एक साक्षीदार फितुर झाला. बाकी साक्षीदार सरकार पक्षाने तपासले नाहीत.

२. तपासीक तसेच वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष सरकार पक्षाने नोंदविली नाही.

३. तपासीक अंमलदार /एजीपी विरूध्द ताशेरे नाहीत.

४. अपीलास अयोग्य.

## बैठकीत दोषसिध्दी संबधाने उपस्थित करण्यात आलेले मुदे.

**१. श्री एन.एस.मुटकुळे.जिल्हा सहा.सरकारी अभियोक्ता अति.जिल्हा व सत्र न्यायालय हिंगोली :—**

यांनी सत्र न्यायालयीन खटल्याचे खटले सुनावणीस येईपावेतो काही खटल्यात मुदेमाल व वैदयकिय पुरावा दाखल झालेला नसतो,त्यामुळे खटला सुनावणीचे वेळी सत्र खटल्यावर त्याचा परिणाम होतो.तपासीक अधिकारी यांनी दोषारोप पत्रासह वैदयकिय पुरावा सादर केल्यास खटला सुनावणीचे वेळी अडचण निर्माण होणार नाही.

**२. श्री एम.एस. पठाडे जिल्हा सहा.सरकारी अभियोक्ता,अति.जिल्हा व सत्र न्यायालय हिंगोली**
यांनी सत्र न्यायालयीन खटल्यांमध्ये समंस व वारंट वेळेवर तामील होत नसल्यामुळे साक्षीच्या वेळेस साक्षीदार हजर होत नाही. त्यामुळे खटल्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम पडतो.

## :— सर्वसाधारण सुचना :—

१. पुढील बैठकीच्या वेळी सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी हिंगोली जिल्हा व प्रथम वर्ग न्यायालय पी.पी. ओ. हे निकालाच्या प्रतीसह बैठकीस हजर राहतील.
२. गुन्हे बैठकीच्या वेळी जिल्हा सहा.सरकारी अभियोक्ता यांना हजर राहणेस कळवावे.
३. सप्टेंबर मध्ये पुन्हा बैठक घेण्यात येईल.सदर बैठकीत माहे जुन, जुलै व ऑगस्ट —२०१९ मध्ये निकाली खटल्याचे निकालाच्या प्रतींसह सर्व जिल्हा सहा.सरकारी अभियोक्ता, सर्व उप विभागीय पोलीस अधिकारी व प्रथम वर्ग न्यायालय पी.पी. ओ.यांनी बैठकीस हजर राहावे.
४. सर्व सत्र न्यायालयीन कोर्ट पैरवी अधिकारी यांनी पण माहे जुलै मध्ये निकाली लागलेल्या केसेसच्या निकालाच्या प्रती तसेच सुनावणीस असलेल्या सत्र खल्यांचे माहितीसह बैठकीस हजर राहावे.

O/C

( यशवंत काळे )
अपर पोलीस अधीक्षक,हिंगोली

प्रति,

१) श्री एन.एस.मुटकुळे, सहायक सरकारी अभियोक्ता अति.जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली.
२) श्री जी.व्ही.घुगे, सहायक सरकारी अभियोक्ता अति. जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली.
३) श्री एम.एस.पठाडे सहायक सरकारी अभियोक्ता, अति. जिल्हा सत्र न्यायालय हिंगोली.
४) श्री एस.डी.कुटे, सहायक सरकारी अभियोक्ता, अति. जिल्हा सत्र न्यायालय,वसमत.
५) श्री एस.के. दासरे, सहायक सरकारी अभियोक्ता, अति. जिल्हा सत्र न्यायालय,वसमत
६) श्री जि. के. जगताप सरकारी अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली.
७) श्री पाईकराव, अभियोक्ता, प्रथमवर्ग न्यायालय,हिंगोली.

प्रत सादर,

१. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.
२. मा. पोलीस अधीक्षक, हिंगोली.